ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १९ मे, १९५४ | अंक १९

## विविध माहिती

**भारतासाठी रेल्वेचे ब्रिटिश डबे**—भारतामधील दक्षिण रेल्वेसाठी ब्रिटिश कारखान्यांकडून १०० रेल्वेचे डबे मागविण्यांत आले आहेत. सदर डब्यांपैकीं ८ डबे तयार झाले असून न्यूपोर्ट येथें बोटीवर चढविण्यांत आले. प्रत्येक डबा ५८ फूट लांबीचा असून त्याचें वजन १२॥ टन आहे. उरलेले डबे तयार झाल्यावर ते ह्याच बंदरांतून भारताकडे रवाना करण्यांत येतील.

**भद्रावती येथील कारखान्यांत नांगर बनविणार**—म्हैसूर राज्यांतील भद्रावती येथील लोखंड व पोलादाच्या कारखान्यांत शेतीसाठी लागणारे नांगर आणि इतर अवजारें बनविण्याचें ठरलें आहे. तयार झालेलीं शेतीचीं अवजारें सहकारी संघटनांच्या मार्फत शेतकऱ्यांना विकण्यांत यावयाचीं आहेत. अवजारांसाठी लागणारें लोखंड व पोलाद तांतडीनें बनविण्यांत येणार आहे.

**कल्याणी येथें रेडिओचा कारखाना**—काँग्रेसचें गेलें अधिवेशन कल्याणी येथें भरलें होतें. त्या जागेवर आतां रेडिओ तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. प. बंगाल सरकारनें ह्यासंबंधीं एका कारखान्याशीं करार केला आहे. कारखान्याच्या इमारतींना ४ लाख रुपये खर्च येईल. कारखान्यांत तयार झालेला मालहि विकत घेण्याचें आश्वासन सरकारनें दिलें आहे.

**आसाममधील आरोग्यविषयक प्रयत्न**—आसाम राज्य सरकारनें दर १०,००० लोकवस्तीसाठी एक दवाखाना उघडण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें पंचवार्षिक योजनेप्रमाणें नद्यांना बांध घालणें, सांडपाण्याची व्यवस्था करणें, इत्यादि कामासाठी कार्यकर्ते तयार करण्यासाठी शिक्षणाचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानांत सिमेंटचा कारखाना**—कोलंबो योजनेप्रमाणें कॅनडा आशिआला जी मदत देणार आहे त्यांतील एक भाग म्हणून पाकिस्तानला कॅनडाकडून सिमेंटच्या कारखान्याची यंत्रसामुग्री मिळणार आहे. मॉन्ट्रिअल येथें यंत्रसामुग्रीपैकीं २५० टन वजनाचें साहित्य बोटीवर चढविण्यांत आलें आहे. त्याची किंमत ५० लाख डॉलर्स आहे. कारखान्यांत दरवर्षी १,००,००० टन सिमेंट तयार होणार आहे तो उत्तर पाकिस्तानांत स्थापन करण्यांत येणार आहे.

**पतिआळा येथें रेडिओ स्टुडिओ**—पतिआळा येथें रेडिओ स्टुडिओ स्थापन करण्याची मागणी तेथील लोक बऱ्याच दिवसांपासून करीत आहेत. भारताचे माहिती आणि नभोवाणी खात्याचे मंत्री श्री. केसकर ह्यांनीं पतिआळा येथील एका समारंभ प्रसंगीं रेडिओ स्टुडिओ स्थापन करण्याचें जाहीर केलें. हा स्टुडिओ दिल्ली येथील स्टुडिओच्या धर्तीवर चालविण्यांत येईल.

**सोडा ॲशवरील निर्बंध रद्द**—सौराष्ट्रामधून सोडा ॲश निर्यात करण्यावर १९५१ च्या जूनमध्यें नियंत्रणें घालण्यांत आलीं होतीं. हीं नियंत्रणें रद्द करण्यांत आल्याचें आतां जाहीर करण्यांत आलें आहे. सोडा ॲशची निर्यात करण्यास आतां व्यापाऱ्यांना परवान्याची जरूर लागणार नाहीं.

**अफगाणिस्थानला अमेरिकेचें कर्ज**—अमेरिकेच्या आयात-निर्यात बँकेनें अफगाणिस्थानला १,८५,००,००० डॉलर्स कर्ज मंजूर केलें आहे. अफगाणिस्थानचा आर्थिक विकास करण्यासाठी जें साहित्य आणि यंत्रसामुग्री लागेल त्याची खरेदी ह्या कर्जाऊ रकमेंतून करण्यांत येणार आहे. अफगाणिस्थानला आर्थिक व तांत्रिक मदत देण्याची तयारी रशिआनेंहि दाखविली होती.

**जपानचीं रेल्वे एंजिनें**—भारतानें जपानकडून मागविलेलीं रेल्वे एंजिनें १९५५ च्या ऑक्टोबरपासून भारतांत येण्यास सुरवात होईल, असें समजतें. हीं एंजिनें आणि रेल्वेचें इतर सामान ह्यांच्या खरेदीसाठी भारताला ५·६ कोटी रुपये यावे लागतील जपानच्या रेल्वेच्या कारखान्यांतून भारतीय कामगारांना शिक्षण देण्याची व्यवस्था होईल कीं नाहीं, तेंहि अजमावण्यांत येणार आहे.

**अमेरिकेंतील चहाचा वाढता खप**— अमेरिकेंत परंपरेच्या दृष्टीनें कॉफी पिण्याची प्रथा अधिक आहे. तथापि १९५३ सालीं १०,३३,००,००० पौंड चहाचा खप झाला, असें टी कौन्सिल ऑफ यू. एस. ए. ह्या संस्थेनें जाहीर केलें आहे. १९५१ सालापासून अमेरिकेंत चहाचा खप दरवर्षी वाढतच चालला आहे. १९५४ सालीं चहाचा खप उच्चांक गांठील, असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे.

**एंजिनांच्या कारखान्यांतील सरकारी भांडवल**—टाटा लोकोमोटिव्ह अँड एंजिनिअरिंग कंपनी ह्या कारखान्याचें एकूण भांडवल सुमारें ७ कोटी रुपये आहेत व त्यापैकीं २ कोटी रुपये भारतीय सरकारनें गुंतविलेलें आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. कंपनीनें अजून नफा जाहीर केलेला नाहीं. कारखान्यांत आणखी भांडवल गुंतविण्याचा सरकारचा सध्यां तरी विचार नाहीं, असें समजतें.

**गौहत्तीच्या विकासाची योजना**-गौहत्ती म्युनिसिपल बोर्डानें शहराचा विकास करण्याची एक योजना राज्य-सरकारकडे सादर केली आहे. ह्या योजनेस २ कोटी रुपये खर्च येणार आहे. योजनेचा अंतर्भाव पंचवार्षिक कार्यक्रमांत करण्यांत यावा अशी मागणी करण्यांत आली आहे. एकूण रकमेपैकीं ९० लाख रुपये पाणीपुरवठा, चांगले रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था, बागा व दवाखाने ह्यांच्यावर खर्च करण्यांत येणार आहे.

# दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई.

## मुंबई राज्यांतील शेतकी ( पीक ) कर्जाच्या गरजांविषयक अंदाज

| जिल्हा | इतर खाद्य धान्यें | ज्वारी, बाजरी | डाळी | ऊंस | फळभाज्या | बटाटा | इतर खाद्य पिकें | भुईमूग | इतर गळ-ताचीं धान्यें | कपास | तंबाखू | वैरण-चारा | एकूण एकर ·०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | १८,२६३ | ५५,५४० | १०,४८५ | ७४ | ८४८ | ३० | १,६०६ | ४,४७० | ३,४०६ | १३,८९९ | १,२८४ | १७,५२० | १,२७,४२५ |
| **कोंकण** | | | | | | | | | | | | | |
| ठाणें | ३,७६६ | ९१६ | ३०९ | १ | ९७ | ... | ... | १ | ८२ | ... | ... | २,१४७ | ७,३१९ |
| मुंबई उपनगर | ४२ | — | — | ... | १५ | ... | ... | ... | ४ | ... | ... | ७७ | १३८ |
| कुलाबा | ३,१३५ | ७६७ | ३२१ | १ | ७१ | ... | ... | ... | ६६ | ... | ... | ४७२ | ४,८३३ |
| रत्नागिरी | २,९७० | २,३५८ | ४९६ | ६ | १२४ | ... | ... | ६ | ३०१ | ... | ... | १,१०२ | ७,३६३ |
| कानडा | १,७१४ | १७ | ७९ | ३१ | ९४ | ... | ... | २ | १२१ | ... | ... | १९९ | २,२५७ |
| एकूण | ११,६२७ | ४,०५८ | १,२०५ | ३९ | ४०१ | ... | ... | ९ | ५७४ | ... | ... | ३९९७ | २१,९१० |
| **महाराष्ट्र** | | | | | | | | | | | | | |
| प. खानदेश | २,३८७ | ८,४५३ | ३,२०५ | २८ | ६७ | ... | ... | २,३०९ | ३६४ | ४८७ | २ | १३ | १७,३१५ |
| पू. खानदेश | १,२५५ | ६,७६० | ५,०१३ | १५ | ३०८ | ... | ... | ३,८३० | ८८ | १,७७३ | २ | ४३ | १९,०८७ |
| नाशिक | २,५४० | १०,१९५ | ३,३१८ | १५६ | २५२ | १८ | ४ | १,६७७ | ७२५ | ५२ | १ | ३,९७५ | २२,८१३ |
| अहमदनगर | १,६७८ | २१,८२२ | २,८९६ | ४३० | २०० | १३ | ... | २९० | १,५६७ | ३७३ | २४ | १,१३८ | ३०,४३१ |
| पुणें | १,३४३ | १५,०४९ | १,५७५ | १४९ | २६० | १०६ | ... | २४१ | १,०६२ | २ | ५ | ४,५१३ | २४,३०५ |
| सोलापूर | ८०१ | २०,२७५ | २,५३७ | १५१ | १०२ | ... | ... | १,७६३ | १,२३९ | ९९ | १९ | १,४५७ | २८,४४३ |
| उ. सातारा | ७६७ | ८,८१४ | १,५६८ | १०० | ११२ | २९ | ... | १,२३९ | २८० | ... | १७ | ४२८१ | १७,२०७ |
| डांग | ९० | १०० | ३२ | ... | ४ | ... | ... | ... | १० | ... | ... | ५ | २४१ |
| एकूण | १०,८६१ | ९१,४६८ | २०,०४४ | १,०२९ | १,३०५ | १६६ | ४ | ११,३४९ | ५,३३५ | २,७८६ | ७० | १५,४२५ | १,५९,८४२ |
| **कर्नाटक** | | | | | | | | | | | | | |
| बेळगांव | २,५६० | ११,४७७ | २,७३० | २६१ | १८८ | १० | ... | २,०८१ | ३८७ | ८५५ | ५२३ | १,१२२ | २२,११४ |
| विजापूर | २,५५० | २१,६९३ | २,५२५ | २० | ११० | ... | ... | ४,२६६ | १,४०९ | २,६७३ | ५ | ६७ | ३५,२१८ |
| धारवाड | ४,४३७ | ९,०८७ | ३,८३६ | २७ | १४८ | ८ | ... | १,७२१ | ९७२ | ४,६०९ | २६ | ९६१ | २५,८३२ |
| कोल्हापूर | १,७८१ | २,६८२ | ४७५ | ३२२ | ४२ | २ | ... | ९१८ | २८ | ४८ | २९९ | १,६७४ | ८,३५१ |
| द. सातारा | ५६४ | ९,२४२ | १,९६३ | ६४ | १०२ | ... | ६९८ | १,४७८ | २३६ | ३९ | १७९ | १,७९६ | १६,३६१ |
| एकूण | ११,८९२ | ५४,१८१ | ११,४२९ | ६९४ | ५९० | २० | ६९८ | १०,५४४ | ३,०३२ | ८,२२४ | १,०३२ | ५,६२० | १.०७.५५६ |
| एकूण मुंबई राज्य | ५२,६४३ | २,०५,२४७ | ४३.१६३ | १,८३६ | ३,१४४ | २१६ | २,३०८ | २६,३७२ | १२,३४७ | २४,९०९ | २,३८६ | ४२,५६२ | ४,१७,१३३ |
| दरएकरीं सरासरीं कर्ज (रु.) | २५ | २० | १५ | ५०० | ३०० | ४०० | २० | ४० | २० | ४० | ५० | १० | सोसायटी देत असलेल्या कर्जाची सरासरी रक्कम: उत्पादन खर्च नव्हे. |
| कर्जाची एकूण गरज (रु.) | १३,१६,०७५ | ४१,०४,९४० | ६,४७,४४५ | ९.१८,००० | ९,४३,२०० | ८६,४०० | ४६.१६० | ९,५४,८८० | २,४६,९४० | ९.९६,३६० | १,१९,३०० | ४,२५,६२० | १,०८,०५,३२,००० |

मुंबई राज्यांतील ४८ जिल्ह्यांची एकूण गरज १,०८,०५,३२,००० रु. म्हणजे सुमारें १०० कोटी रुपये होते. त्यापैकीं २५% गरज शेतकरी स्वतः भागवतो, २५% रक्कम सावकारी कर्जें, तगाई कर्जें, ह्यांपासून मिळत आणि बाकीची ५०% गरज सहकारी संस्थांनीं भागविली पाहिजे. म्हणजे ५० कोटी रुपयांची सोय त्यांनीं केली पाहिजे. सहकारी संस्था ( बँका धरून ) फार तर त्याच्या २०% रक्कम देऊं शकतील, बाकीची रिझर्व्ह बँकेनें व सरकारनें पुरविली पाहिजे.

# अर्थ

बुधवार, ता. १९ मे, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शेतकी कर्जपुरवठा व्यवस्थेंत सुधारणा कशी होईल ?

### मुंबई राज्य सहकारी बँकेचा आढावा

३० जून, १९५३ अखेरचा मुंबई राज्य सहकारी बँक लि. चा वार्षिक वृत्तांत आमचेकडे आला आहे. ह्या ७३ पृष्ठांच्या पुस्तिकेंत बँकेच्या कारभाराप्रमाणेंच राज्यांतील सहकारी पत-पुरवठ्याचा आढावा घेण्यांत आला असल्यानें, ह्या पुस्तिकेचें महत्त्व सहकारी चळवळींतील व्यक्ती व संस्था ह्यांस विशेष वाटेल. तक्ते, आराखडे, चित्रें, इत्यादींच्या साहाय्यानें विवेचन व माहिती ह्यांत सुबोधता आणलेली आहे. शेतकी पत-पुरवठ्याचें त्यांत केलेलें विवेचन सद्यःपरिस्थितींत फारच जिव्हाळ्याचें आहे.

पतवाल्या शेतकऱ्यांना शेतकी व विक्री ह्यांसाठी भांडवल-पुरवठ्याची संघटित व्यवस्था मुंबई राज्यांत आतां तीन-चार वर्षें अंमलांत आहे. सावकारीवर नियंत्रण, जुन्या कर्जाची तड-जोड, इत्यादींमुळें शेतकऱ्यांना कर्ज मिळणें कठीण होऊं लागलें व खाजगी कर्जपुरवठ्याची जागा भरून काढण्यासाठी संघटनेची तांतडीची गरज निर्माण झाली. मुंबई राज्यांत सहकारी संस्था त्या कामीं उत्कृष्टपणें उपयोगी पडतील असें ठरलें. आवश्यक त्या पुनर्घटनेनंतर व सरकारी सहाय्यानें ह्या सहकारी संस्थांचा उपयोग अल्प व मध्यम मुदतीचीं शेतकीसाठी कर्जें देण्याकडे त्याचप्रमाणें पिकें करण्यासाठी, मालाची विक्री करण्यासाठी व शेत सुधारणेसाठी कर्जें देण्याकडे करतां येईल, अशी अपेक्षा होती.

ही योजना कार्यक्षमतेनें अंमलांत येऊं शकली नाहीं, ह्याचें कारण तिचें खरें स्वरूप सहकारी कार्यकर्त्यांना नीट समजलेंच नाहीं आणि कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना तर तिचें रहस्य उमगलेंच नाहीं. कर्ज पुरवठा, शेतीचें उत्पादन आणि त्याची विक्री ह्यांची साखळी नीट जुळवली गेली नाहीं. माल-विक्रीच्या सोईस्कर संस्था अस्तित्वांत नव्हत्या; कर्जदारांतहि त्याबाबतींत हितकारक जागरूकपणा नव्हता. कित्येक खरेदी-विक्री संस्थांचा कारभार गैरशिस्त होता, त्यामुळें शेतकऱ्यांचा त्यांवरील विश्वास उडाला. कित्येक ठिकाणच्या दुष्काळामुळें पतवान शेतकऱ्यांना दिलेलीं कर्जें वसूल होऊं शकलीं नाहींत, इतकेंच नव्हे तर पुढील वर्षाच्या पिकासाठी जादा कर्ज द्यावें लागलें. ह्या सर्व कारणांमुळें वार्षिक कर्जमर्यादा मंजूर करण्याची जुनी पद्धतच बऱ्याच अंशीं अद्याप अंमलांत राहिली आहे.

ह्यासंबंधांतील प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांचें मत स्पष्ट आहे. ते म्हणतात:-सहकारी मध्यवर्ती बँकांनीं-राज्य सहकारी बँकेनें सुद्धां-कर्ज देण्याची आपली जुनी पद्धत सुधारलेली नाहीं आणि शेतकऱ्यांसहि सुधारावयास लावलेलें नाहीं. ज्या पिकासाठी कर्ज दिलें, त्या पिकाचा विल्हेवाट करतोक्षणींच कर्जाची परतफेड झाली पाहिजे, हा तर पीक कर्जयोजनेचा गाभा आहे. अशा अटींच्या शेतमालाच्या पतपत्रिकांवर बँका रिझर्व्ह बँकेकडून पैसा उभा करतात आणि निदान रिझर्व्ह बँकेशीं केलेला करार पाळण्यासाठी तरी त्यांनीं पीक कर्ज-योजना काटेकोरपणें अंमलांत आणली पाहिजे. पिकाचें नक्की क्षेत्र समजून घेणें, विशिष्ट क्षेत्रांतील विशिष्ट पिकांसाठी दर एकरीं कर्ज-मर्यादा ठरविणें आणि प्रत्येक पीक-कर्ज मुदतीप्रमाणें व पिकाच्या विनियोगाप्रमाणें फेड होण्याचा आग्रह धरणें, ह्या बाबी त्यांत महत्त्वाच्या आहेत. राज्य-सहकारी बँकेचे, सहकारी खात्याचे व मध्यवर्ती बँकांचे अधिकारी, ह्यांना स्वतःलाच पीक-कर्ज योजनेचें स्वरूप व व्यवस्था ह्यांचें पूर्ण आकलन झालें नव्हतें, असें म्हणणें मुळींच अतिशयोक्तीचें होणार नाहीं. तथापि, शेतकी-कर्ज पुरवठ्याचे कामीं प्रगति घडवून आणावयाची असल्यास, पीक कर्जाची सुसूत्र योजना अंमलांत आणली गेली पाहिजे. कर्जें देणें सोपें व्हावें व त्यास लागणाऱ्या वेळांत बचत व्हावी, हा नव्या धोरणाचा एक महत्त्वाचा उद्देश होता. त्या दृष्टीनेंच, असा संकेत होता कीं, पिकाचें क्षेत्र एकदां ठरल्यावर विशिष्ट प्रदेशासाठी दर एकरीं जी कर्ज-रक्कम ठरेल, ती निष्कारण कमी केली जाऊं नये; सभासदास ती मिळालीच पाहिजे. तीन वर्षांतून फक्त एकदाच वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं कर्जाच्या वैयक्तिक मर्यादा नव्यानें घालून द्याव्यात आणि स्थानिक कर्जवितरकानें ठरलेलें कर्ज शेतकऱ्यास द्यावें, असेंहि गृहीत होतें. स्वीकारलेल्या ह्या धोरणाचें कोणतेंच अंग अद्याप कोठेंहि अस्तित्वांत आलेलें दिसत नाहीं. खालपासून वरपर्यंतच्या पायरीपर्यंत, कर्जाची रक्कम मनाप्रमाणें कमी करणें चालूच आहे; अधिकार खालच्या थरांकडे वर्ग करण्याचीं चिन्हें अजून दिसत नाहींत आणि कारभारांत सुटसुटीतपणा आलेला नाहीं; वेळेची बचतहि पण झालेली आढळत नाहीं.

प्रगतीच्या आजवरच्या गतीबद्दल प्रा. गाडगीळ असमाधानी नाहींत. राज्य-बँकेच्या आढाव्याप्रमाणें, ह्यापेक्षा अधिक वेगानें प्रगति करणें सुरक्षित ठरलें नसतें, असें मानण्यास जागा आहे. तथापि सध्याची शेतकी कर्जपुरवठ्याची व्यवस्था कित्येक बाबतींत अत्यंत गैरपद्धतीची व तर्कशास्त्रास सोडून आहे, त्यामुळें नवी पीक कर्ज व्यवस्थेचा अवलंब करणें जरूरच होतें. प्रा. गाडगिळांच्या मतें, परतफेडीच्याच मुद्यावर कर्ज देणें ही पतव्यवस्था नव्हेच; शेतकऱ्यांची उत्पादक शक्ति ही महत्त्वाची बाब असून तिच्यावरच अवलंबून रहाणें युक्त होय. ही शक्ति व तिचेवरील कर्ज हीं लवचिक असूं शकतात; पण पूर्वीची परतफेडीच्या भूमिकेवरील कर्जपद्धति सोडल्यावरच ह्या नव्या व्यवस्थेस वाव मिळणार. राज्य सरकार व रिझर्व्ह बँक ह्यांची मदत सार्थक व्हावयाची असेल, तर मध्यवर्ती बँकांनीं व राज्य बँकेनें सुसूत्रपणें काम केलें पाहिजे, ह्या नव्या व्यवस्थेशीं एकरूप झालें पाहिजे आणि सहकारी खात्यानेंहि कर्तव्यनिष्ठा बाळगली पाहिजे. प्रा गाडगीळ ह्यांचें हें सर्व म्हणणें खरें असलें, तरी जोंपर्यंत सहकारी संस्था कर्जपुरवठ्याच्या इतर साधनांची जागा पूर्णपणें घेऊं शकलेल्या नाहींत, हिशेब आणि व्यवस्था ह्यांची पातळी कनिष्ट दर्जाची आहे, विक्रीच्या संघटनेचा अभाव आहे, तोंवर पीक कर्ज व्यवस्था सर्व ठिकाणीं चालू करणें अवघड जाईल हें

उघड आहे, म्हणून, प्रा. गाडगीळ ह्यांनीं दिग्दर्शित केलेली योजना कांहीं निवडक ठिकाणीं, कांहीं विशिष्ट पिकांसाठी चालू करावी व तेथें कर्ज व विक्री ह्यांची सांगड घालण्यांत यावी, अशाबद्दल पूर्णपणें मतैक्य आहे. ऊंस, बटाटे, कपास, भुइमूग, इत्यादि रोख पैसा मिळवून देणाऱ्या पिकांसाठी प्रा. गाडगीळांची योजना अंमलांत आणणें अधिक सोईचें आहे, हें उघड आहे.

---

### दशवार्षिक राष्ट्रीय योजना सर्टिफिकिटें

राष्ट्रीय योजनाकर्जाचा एक भाग म्हणून राष्ट्रीय योजना-रोखे (नॅशनल प्लॅन सर्टिफिकेटस) या नांवाच्या दशवार्षिक बचतरोख्यांची नवी मालिका विक्रीस काढल्याचें भारत सरकारनें जाहीर केलें आहे. या रोख्यांच्या विक्रीस १० मे १९५४ पासून आरंभ झाला असून, राष्ट्रीय योजना कर्ज सुरुं असेपर्यंत ते रोखे सेव्हिंग्ज बँकेचा व्यवहार करणाऱ्या देशांतील सर्व पोस्टकचेऱ्यांत मिळूं शकतील. छोटी रक्कम गुंतविणाऱ्या विशेषतः ग्रामीण विभागांतील व्यक्तींच्या सोयीसाठी नवे रोखे काढण्यांत आले आहेत. २५ व ५० रु. किंमतीचे रोखेच विकण्यांत येतील. एका व्यक्तीस जास्तींत जास्त १,००० रु. त्यांत गुंतवितां येतील.

रोखे खरेदी केल्याच्या दिनांकापासून दहा वर्षें पुरीं झाल्यावर २५ रुपयांच्या रोख्याचे ३६ रु. ४ आ. आणि ५० रुपयांच्या रोख्याचे ७२ रु. ८ आ. परत मिळतील. मुदत पुरी होईपर्यंत हे रोखे न मोडल्यास, या रोख्यांवर दरसाल दर शेकडा ४॥ टक्के या दरानें व्याज सुटेल. रोखे घेतल्यापासून एक वर्षानंतर ते वटवितां येतील. परंतु त्या त्या मुदतीसाठीं मिळणाऱ्या उत्पन्नाची रक्कम अशा प्रकारें ठरविली आहे कीं रोखे धारण करणाऱ्यांस ते मुदत पुरी होईपर्यंत वटवूं नयेत असें वाटावें. या रोख्यामुळें अति सामान्य नागरिकांसहि राष्ट्रीय योजनाकर्जास हातभार लावतां येईल असा भारत सरकारला विश्वास आहे.

---

### फॅक्टरी ॲक्टखालीं ८३ मालकांना व ६५ व्यवस्थापकांना दंड

१९५४ च्या पहिल्या तिमाहींत मुंबई राज्यांतील ११० कारखान्यांच्या ८३ मालकांना व ५६ व्यवस्थापकांना, १९४८ च्या फॅक्टरी ॲक्टाच्या तरतुदींचा भंग केल्याबद्दल निरनिराळ्या रकमेच्या दंडाच्या शिक्षा झाल्या.

यापैकी ५२ कारखान्यांच्या ४० मालकांना व २६ व्यवस्थापकांना, कामगारांना जास्त वेळ काम करावयास लावल्याबद्दल शिक्षा झाल्या. १७ कारखान्यांच्या १३ मालकांना व ७ व्यवस्थापकांना त्यांनीं धोक्याच्या यंत्रांपासून कामगारांचें संरक्षण व्हावें म्हणून संरक्षक उपाययोजना न केल्याबद्दल, ११ कारखान्यांच्या ९ मालकांना व ६ व्यवस्थापकांना योग्य रीतीनें रजिस्टरें न ठेवल्याबद्दल व कायद्यानुसार नोटीसबोर्डावर नोटिसा न लावल्याबद्दल, ११ कारखान्यांच्या ९ मालकांना व ७ व्यवस्थापकांना कायद्यांत सांगितल्याप्रमाणें कामगारांना आरोग्य व स्वच्छतेबाबत निरनिराळ्या सवलती न पुरविल्याबद्दल आणि १९ कारखान्यांच्या १२ मालकांना व १० व्यवस्थापकांना लायसेन्स न घेतल्याबद्दल, प्रथमोपचाराचीं साधन न ठेवल्याबद्दल कामगारांना रजा न दिल्याबद्दल, कामगारांना पुस्तकें न दिल्याबद्दल, साप्ताहिक सुट्टीच्या दिवशीं कामगारांना कामास लावल्याबद्दल, अपघाताची बातमी न कळविल्याबद्दल आणि न्यायालयानें हुकूम देऊनहि परवाने नवीन करून न घेतल्याबद्दल शिक्षा झाल्या.

### दि शाहूपुरी मर्चंटस् असोसिएशन, कोल्हापूर

ह्या ॲसोसिएशनचा रौप्यमहोत्सव मंगळवार दि. १८ मे रोजीं कोल्हापूर जिल्ह्याचे कलेक्टर, डॉ. ए. यू. शेख, आय. ए. एस., ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. सकाळीं स्वागताध्यक्षांचें भाषण, अहवालवाचन, बक्षिस-समारंभ, अध्यक्षीय भाषण, फोटो असा कार्यक्रम होऊन रात्रीं ८ नंतर करमणुकीचा कार्यक्रम झाला.

---

**अणुबाँबपासून संरक्षण**—हॉलंडच्या सरकारनें अणुबाँबपासून नागरिकांचें रक्षण करण्यासाठीं भूमिगत आश्रयस्थान बांधलें आहे. आश्रयस्थानांत वेगवेगळे छोटे विभाग पाडण्यांत आले आहेत, त्यांत ५०० माणसें एका वेळीं आश्रय घेऊं शकतील. खालीं स्वयंपाकघर बांधलेलें आहे आणि किरणोत्सर्गी वस्तूंपासून रक्षण करणारें छत बांधण्यांत आलें आहे. आश्रयस्थान जमिनींत ११ फूट खोलीवर आहे.

**हैड्रोजन बाँबसाठीं रशिअन पद्धत**—पॅसिफिक महासागरांत स्फोट करण्यांत आलेला अमेरिकन हैड्रोजन बाँब रशिअन शास्त्रज्ञांनीं संशोधिलेल्या पद्धतीप्रमाणें तयार करण्यांत आला होता असें समजतें. ही पद्धत अव्यवहार्य असल्याचें मत अमेरिकन तज्ज्ञांनीं प्रथम व्यक्त केलें होतें. रशिआनें हैड्रोजन बाँबचा स्फोट घडवून आणल्यावर जो किरणोत्सर्गी ढग हवेंत उडाला त्याचें संशोधन करून अमेरिकन तज्ज्ञांनीं ही पद्धत पुन्हां शोधून काढली.

**भारतामधील पंख्यांचें उत्पादन**—१९५२ सालीं भारतीय कारखान्यांनीं १,९५,४०० विजेच्या पंख्यांचें उत्पादन केलें होतें १९५३ सालीं २,०१,८०५ पंख्यांचें उत्पादन करण्यांत आलें.

WILICO
✣ तेजी असो वा मंदी असो ✣
★ आपला उद्योग व्यापार अबाधित चालूं ठेवण्याकरितां आपल्या आयुष्याची तरतूद आजच करा.
★ वारसाकर तरतूद योजनेसारख्या अनेक आकर्षक योजना.
अधिक माहिती शाखाधिकारी आनंदानें देतील.
—आजच भेटा अगर लिहा—
फोन नं. ३४०२
वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा
पुणें शाखा:—वेस्टर्न इंडिया हाऊस
लक्ष्मी रस्ता, पुणें नं. २

### भारत आणि रशिआ ह्यांच्यांतील व्यापार

रशिअन सरकारनें भारताशीं ५ वर्षे मुदतीचा एक व्यापारी करार केला आहे. तथापि प्रत्यक्ष व्यापारी देवाणघेवाणीला अद्याप फारशी सुरुवात झालेली नाहीं. भारतामधील उद्योगपतींचें आणि शेतीविषयक प्रतिनिधींचें मंडळ रशिआंत पाठविण्याविषयीं रशिआकडून भारताला आमंत्रण आल्याची वार्ता आहे. भारत आणि रशिआ ह्या उभयता देशांत जो व्यापारी करार झालेला आहे त्यांत रशिआ निर्यात करण्यास तयार असलेल्या वस्तूंची एक यादीहि जोडण्यांत आलेली आहे. ही यादी बरीच मोठी असून तींत पुढील मालाचा प्रामुख्यानें समावेश होतो. अन्नधान्य, लोखंड व पोलादाचें सामान, रसायनें, रंगसाहित्य, कांचेचीं भिंगें, सिनेमाच्या कच्च्या फिल्म्स, नानाप्रकारचीं यांत्रिक हत्यारें, बोअरिंग करण्याचीं यंत्रें, खाणीची यंत्रसामुग्री, रस्ते बांधण्याचें यंत्रसाहित्य, विजेची यंत्रसामुग्री, यंत्रचलित नांगर आणि इतर शेतकीविषयक अवजारें. भारतानें रशिआशीं केलेल्या व्यापारी करारावर गेल्या डिसेंबरमध्यें सह्या करण्यांत आल्या. त्यानंतर आंतरराष्ट्रीय परिस्थितींत बराच बदल झालेला असून परदेशी मदतीबद्दल, विशेषतः अमेरिकेच्या मदतीबद्दल भारतीय सरकारला साशंकता वाटूं लागली आहे. भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी नुकतेंच जें कर्ज भारतीय सरकारनें जाहीर केलें त्याचा उगमहि वरील साशंकतेंतून झाला आहे, असें म्हणतात. स्वतःच्या पायावर उभें राहण्याचे हे प्रयत्न तर योग्यच आहेत. पण रशिआसारख्या प्रगत राष्ट्राकडून आधुनिक यंत्रसामुग्री मिळत असेल तर ती घेण्यासहि हरकत नाहीं. भारतांतून रशिआंत जाणाऱ्या प्रतिनिधिमंडळाला रशिआंतील बाजारपेठेची पाहणी करण्यास चांगली संधि मिळेल आणि रशिअन मालाची किंमत व दर्जा ह्यांच्याविषयींहि वस्तुस्थितिनिदर्शक कल्पना करतां येईल.

---

### सहकारी संस्थांसंबंधीची आंकडेवारी

मुंबई सरकारनें सहकारी खात्यांत एक आंकडेशास्त्रविषयक (स्टॅटिस्टिकल) विभाग सुरू केला आहे. निरनिराळ्या, विशेषतः पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या सहकारी संस्थांची आंकडेवारी प्रसिद्ध करणें, ती संकलित करणें व पडताळून पाहणें, हें काम या विभागाकडे देण्यांत आलें आहे. या विभागाचीं इतर कामें पुढीलप्रमाणें आहेत.

(१) मिळालेल्या माहितीचें पृथःकरण करून त्याचा अर्थ लावणें. (२) मिळालेल्या माहितीच्या आधारें सहकारी खात्याच्या निरनिराळ्या कामांची फलनिष्पत्ति अजमावणें (३) खास प्रश्नाबाबत चौकशी करण्याचें काम हातीं घेणें. उदाहरणार्थ एक किंवा दोन ग्रामोद्योगांची चांचणीच्या दृष्टीनें पाहणी करणें किंवा विशिष्ट भागांतील कर्जबाजारीपणाचें प्रमाण पाहणें किंवा विशिष्ट गांवाच्या आर्थिक परिस्थितीची पाहणी करणें आणि (४) विशिष्ट भागांतील शेतीच्या पद्धती निश्चित करणें, जमिनीची पाहणी करणें, आणि सहकारी शेती वा लिफ्ट इरिगेशन संस्थांसंबंधीच्या योजनेंत समाविष्ट केलेल्या जमिनीची उत्पादनक्षमता तपासणें, वगैरे कामें करणें. पंचवार्षिक योजना अंमलांत आणण्याच्या बाबतींत सहकारी पद्धतीचा अवलंब करण्याचें ठरविण्यांत आल्यापासून गेल्या कांहीं वर्षांत सहकारी खात्याच्या कामांत बरीच वाढ झाली आहे. राष्ट्ररचनेच्या कार्यक्रमाचें यश सहकारी संस्थांवर अवलंबून असल्यामुळें निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांची माहिती गोळा करून ती संकलित करण्यासाठी आणि वेळोवेळीं उद्भवणाऱ्या खास प्रश्नांची चौकशी करण्यासाठी एकादी यंत्रणा उभारणें आवश्यक झालें.


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

**शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साल्वेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## कण आणि क्षण

( लेखकः—श्री. श्रीपाद वामन काळे, संपादक 'अर्थ', दुर्गा-विलास, पुणें नं. ४ किंमत रु. २॥. )

हें पुस्तक वाचल्यावर कांहीं वर्षांपूर्वी सांगलीच्या श्रीगजानन मिलचे धनी श्री. विष्णुपंत वेलणकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या "जगांत वागावें कसें" या पुस्तकाची आठवण झाली. श्री. काळे यांच्या या पुस्तकाचें वर्णन "घरांत व जगांत वागावें कसें" हें थोडक्यांत दाखवून देणारें पुस्तक असें यथार्थपणें करतां येईल. श्री. काळे यांचें अवलोकन सूक्ष्म असून त्या अवलोकनाचा उपयोग त्यांनीं या पुस्तकांत मुक्त हस्तानें केला आहे विशेषतः मध्यम वर्गांतील गुणदोष बारकाईनें पाहून दोष दूर करण्याचे दृष्टीनें त्यांनीं फारच चांगलें मार्गदर्शन केलें आहे. मध्यम वर्गांतील आबालवृद्ध सर्वांनींच हें पुस्तक वाचून मनन करून आपल्या वागण्याबोलण्यांत सुधारणा केली पाहिजे. आमचे मतें हें पुस्तक मोठ्या माणसांपेक्षा मुलांमुलींच्या वाचनांत येणें अधिक आवश्यक आहे. मोठ्या माणसांच्या संवयी दृढमूल झालेल्या असतात. पुस्तकांतील दोषाविष्करण त्यांना पटलें तरी तें अंमलांत आणणें त्यांना बरेंच कठीण असतें. त्या मानानें योग्य वयाच्या मुलामुलींना हें पुस्तक अधिक उपयुक्त ठरेल. पुस्तकाची भाषा घरगुती, सोपी असल्यानें त्याचा केव्हांहि कंटाळा येत नाहीं. प्रत्येक मातापित्यानें या पुस्तकाची एक प्रत विकत घेऊन आपल्या मुलांमुलींकडून तें वारंवार वाचून घ्यावें.

हल्लीं शाळांमधून शिक्षकाचे एकाद्या तासाचे गैरहजेरींत मुलांना उपयुक्त पुस्तकें वाचण्यास देण्याची प्रथा आहे. त्या पुस्तकामध्यें श्री. काळे यांच्या या पुस्तकाचा अवश्य समावेश व्हावयास पाहिजे.

श्री. काळे यांनीं नवीन पिढीला मार्गदर्शन करील असें हें उपयुक्त पुस्तक लिहून मराठी भाषेंतील उपयुक्त पुस्तकांत चांगली भर घातली आहे. वाचक त्याचा स्वतःला उपयोग करून ग्रंथकर्त्याच्या श्रमाचें चीज करतील अशी आशा आहे.

—व्यापारी महाराष्ट्र, एप्रिल १९५४

---

**रशिआचें वैमानिक दल**—१९५१ सालापासून रशिआनें आपलें रणगाडा—दल अधिक वाढवून शिवाय तें अद्ययावत् पद्धतीचें केलें आहे. सध्या रशिअन विमान—दलांतील जवळ जवळ सर्व लढाऊ विमानें जेटचीं आहेत. हलक्या वजनाचीं बाँब-फेकीं विमानेंहि ६६ टक्के जेटचीं आहेत. रशिआच्या कक्षेंतील राष्ट्रांचें सैनिक सामर्थ्यहि १० लाखापर्यंत पोचलें आहे.

**ओरिसांत सोनें सांपडण्याची शक्यता**—ओरिसा राज्यांत सोनें सांपडण्याची शक्यता आहे, असें लोकसभेंत सांगण्यांत आलें. ह्या राज्यांत सुमारें ४० मैल लांब व १ मैल रुंद अशा पट्टयांत सोन्याच्या खाणींचें संशोधन चालू होतें. संशोधनांत यश आलें असल्याचें समजतें.

**जर्मनींत हिंदी कादंबरीची लोकप्रियता**—पूर्व जर्मनींतील पुस्तकांच्या दुकानांतून डॉ. मुल्कराज आनंद ह्यांनीं लिहिलेली 'मजूर' ही कादंबरी विक्रीस ठेवण्यांत आली आहे. ह्या कादंबरीची ही दुसरी आवृत्ति विकण्यांत येत आहे. कादंबरीचीं ४४० पानें असून तिची किंमत रुपयांच्या चलनांत ६ रु. ८ आणे अशी ठेवण्यांत आली आहे.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११.७०,?००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,९००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
शाखाः- दादर माहीम
शाखाः- बेळगांव पुणें

स्थापना १९१८


---

### अमेरिकेंतील गगनचुंबी इमारती

अमेरिकेंतील बांधकामाच्या धंद्याला सध्या तेजी आलेली आहे. त्यांतहि विशेष कल गगनचुंबी इमारती बांधण्याकडे दिसून येत आहे. गेल्या पांच वर्षांत कचेऱ्यांना उपयोगी पडणाऱ्या अशा प्रकारच्या १०० इमारती बांधण्यांत आल्या. इतक्या इमारती गेल्या १५ वर्षांतहि बांधण्यांत आल्या नव्हत्या, असें समजतें. आकाशाला भिडणाऱ्या ह्या प्रकारच्या इमारती बऱ्याच लोकप्रिय झाल्या आहेत हें खरें, पण अधिकाधिक उंच आणि चांगल्या गगनचुंबी इमारती बांधण्याचे दिवस आतां संपत आले आहेत असें दिसतें. कांहीं ठराविक मजल्यापर्यंत ह्या इमारती आर्थिक दृष्ट्या परवडतात. पण ही मर्यादा ओलांडून अधिक मजले चढविल्यास ते खर्चाच्या व उत्पादनाच्या दृष्टीनें परवडत नाहींत असें आढळून येऊं लागलें आहे. न्यूयॉर्कमधील एम्पायर स्टेट बिल्डिंग ह्या इमारतीला १०२ मजले आहेत अलीकडे बांधण्यांत येणाऱ्या इमारतींना मात्र ३० पेक्षा अधिक मजले क्वचितच असतात. तथापि, अजूनहि कांहीं प्रचंड इमारती बांधण्यांत येत आहेत. न्यूयॉर्कमधील ग्रँड सेंट्रल स्टेशननजीक अशीच एक इमारत बांधण्याचें काम सध्यां चालू आहे. ह्या इमारतींत १३,००,००० चौरस फूट जागा कचेऱ्यांसाठीं वापरतां येईल. दुसऱ्या एका मोठ्या इमारतीला १६,००,००,००० डॉलर्स खर्च येणार आहे. ह्या इमारतींत २० च मजले असतील; पण तींत ६०,००,००० चौरस फूट जागा असेल. ही जागेची सोय एम्पायर स्टेट बिल्डिंगपेक्षा तिप्पट आहे. इमारतीच्या छताचें क्षेत्र ९ एकर इतकें असेल. बॉस्टन शहरांतहि एक बांधकाम कंपनी ७,५०,००,००० डॉलर्स खर्चून एक टोलेजंग इमारत बांधणार आहे. सध्यां ह्या जागीं रेल्वेचा रस्ता व इमारती असून जागेचें एकूण क्षेत्र २८ एकर आहे.

---


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची सहामाही चर्चात्मक सभा दिनांक २३-५-५४ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां बँकेच्या मुख्य कचेरींत भरणार आहे.

तरी सर्व सभासदांनीं सभेस हजर रहावें अशी विनंती आहे.

पुणें शहर, मो. वि. रवडे,
११-५-५४ मॅनेजिंग डायरेक्टर

### दोन वकिलांची फी आकारण्यास परवानगी

१९५४ चा बॉम्बे प्लीडर्स ( अमेंडमेंट ) ॲक्ट मुंबई सरकारच्या ता. ७ मे च्या गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे. या दुरुस्त कायद्यानुसार सबॉर्डिनेट कोर्टांतील कामकाजाच्या बाबतींत दोन वकिलांच्या फीचा खर्च आकारतां येता येणाऱ्या दाव्याच्या रकमेची मर्यादा ५,००० रु ची १०,००० रु. करण्यांत आली आहे. वस्तूंच्या व स्थावर मालमत्तेच्या किंमती वाढल्या असल्यामुळें १०,००० रुपयांपेक्षा कमी रकमेचा दावा गुंतागुंतीचा समजतां येत नाहीं, आणि म्हणून त्याच्या बाबतींत दोन वकिलांच्या फीचा खर्च समर्थनीय ठरत नाहीं, असें त्या दुरुस्तीचें समर्थन आहे.

---

### साखरेच्या उत्पादनांत घट

| मोसम | उत्पादन ( लक्ष टन ) |
|---|---|
| १ नोव्हेंबर, १९५३ ते ३१ मार्च, १९५४ | ९.४९ |
| १ नोव्हेंबर, १९५२ ते ३१ मार्च, १९५३ | ११.२७ |
| तारीख | कारखान्यांचा शिल्लक सांठा |
| ३१ मार्च, १९५४ | ६.१७ लक्ष टन |
| ३१ मार्च, १९५३ | ९.८२ ,, ,, |

### ग्रेट ब्रिटनमधील बँक रेट कां उतरवला ?

बँक ऑफ इंग्लंडनें बँक रेट ३½% चा ३% केल्याचें १३ मे रोजीं जाहीर केलें. ग्रेटब्रिटनमध्यें गुंतवणुकीसाठी बाहेरून, विशेषतः अमेरिकेंतून, बराच पैसा येत असे. न्यूयॉर्कमधील व्याजाच्या दरापेक्षा लंडनमधील व्याजाचे दर अमेरिकन पैसेवाल्यांना आकर्षक वाटत पैसे पाठविण्याचे व परत आणण्याचे चार्जेस हिशेबांत घेऊनहि लंडनमध्यें त्यांना ५/८% व्याज अधिक सुटत असे. पैशाचा हा ओघ ग्रेट ब्रिटनला हितकारक न वाटल्यानें, बँकरेट उतरविण्याचा निर्णय घेण्यांत आला. ह्यापूर्वी, १७ सप्टेंबर १९५३ रोजीं, बँक रेट ४% चा ३½% करण्यांत आला होता.

### नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांच्या रूपानें जादा बोनस


१९५३ चा रोजंदारीबाबतचा ( मुंबई दुरुस्ती ) कायदा १० मे पासून अंमलांत आला आहे. त्याच्या नियमान्वयें नोकरींतील इसमास जादा बोनस १२ वर्षें मुदतीचें नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांच्या रूपानें देण्यांत यावा अशी तरतूद करण्यांत आली आहे.

---

### रिझर्व्ह बँकेच्या भागांचा मोबदला

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या भागांचा मोबदला देण्याची सध्यांची व्यवस्था ३० सप्टेंबर रोजीं संपते. त्या तारखेनंतर भारत सरकारच्या पूर्वमंजुरीनंतरच मोबदला मिळूं शकेल.



किर्लोस्कर



हातपंप

उन्हाळी पिकासाठी व घरगुती पाणीपुरवठ्यासाठी खात्रीची उपाययोजना.

विशेष माहितीसाठी लिहा.



सेंट्रिफ्युगल पंप

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी द. सातारा

कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "

गुजराती भाषांतर
प्रो. शशिन ओझा, भावनगर.
प्रस्तावना :
मा. दादासाहेब मावळंकर

मराठी आवृत्ति
सहा महिन्यांत संपली
दुसरी आवृत्ति
मे, १९५४ अखेर प्रसिद्ध होईल.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. घों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

### कुटुंब-नियोजनाला मातांचा पाठिंबा

लखनौ विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ सोशिऑलॉजी अँड ह्यूमन रिलेशन्स ह्या संस्थेनें ग्रामीण विभागांत कुटुंबनियोजनासंबंधीं संशोधन करण्याचें काम हातीं घेतलें होतें. उत्तर प्रदेशांतील अल्मोरा, मीरत, इटावा, लखनौ, प्रतापगड आणि गोरखपूर ह्या जिल्ह्यांतील कांहीं खेडीं संशोधनासाठीं निवडण्यांत आलीं होतीं. ह्या संशोधन कार्याचा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून कुटुंबनियोजनाविषयीं ग्रामीण भागांतील लोकांच्या भावना काय आहेत तें कळण्यास चांगली मदत होते. संशोधकांनीं ६०० विवाहित जोडप्यांचीं कुटुंबनियोजनाविषयींचीं मतें अजमावून पाहिलीं. तेव्हां त्यांना असें आढळून आलें कीं, बऱ्याच मातांना तीनचारपेक्षां अधिक मुलें नको होतीं आणि तींहि ३ ते ५ वर्षांच्या अंतरा अंतरानें पाहिजे होतीं. विवाहित जोडप्यांपैकीं ३० ते ४० टक्के जोडपीं संततिनियमनाच्या निरनिराळ्या रीति शिकण्यास उत्सुक होतीं, असें दिसून आलें. तथापि संततीच्या बाबतींत जुन्या परंपरागत कल्पनांचा पगडा बऱ्याच स्त्री–पुरुषांवर दिसून आला. स्त्रियांपैकीं ८७ टक्क्यांपेक्षा अधिकांचें आणि पुरुषांपैकीं त्याहीपेक्षा अधिकांचें असें मत होतें कीं, संतति होणें न होणें हें परमेश्वराधीन आहे. संतती नको असेल तर स्त्री–पुरुषांनीं संपूर्ण मनःसंयमन करणें एवढा एकच उपाय त्यांच्या मतानें प्रभावी होता. ग्रामीण भागांत संततिनियमनाचा व कुटुंबनियोजनाचा प्रचार कितपत यशस्वी होईल ह्याविषयीं शंका व्यक्त करण्यांत येते आणि शंका येण्यासारखी परिस्थिति आहेहि, पण लखनौ विद्यापीठातर्फे करण्यांत आलेल्या पाहणीवरून असें दिसून आलें कीं, ग्रामीण भागांतहि कुटुंबनियोजक आणि आरोग्यविषयक प्रचार ह्यांच्याविषयीं बरीच आस्था आहे. प्रचार योग्य रीतीनें करण्यांत आल्यास खेडेगांवांतील बालमृत्यु आणि मातांचे मृत्यु ह्यांच्या संख्येंत पुष्कळच घट होईल ह्यांत शंका नाहीं.


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २

॥ भाग्याचिये मडसें । उद्यमाचेनि मिसें ॥
॥ समृद्धिजात आपैसें । घर रिघे ॥ ज्ञानेश्वरी

### ☆ उद्यमाला भगवंताचें अधिष्ठान असलें कीं भाग्य ☆

भागीदारांची वार्षिक सभा येत्या जूनमध्यें आहे

### त्या वेळीं सिंडिकेट समृद्ध होत आहे हें प्रत्यक्ष दिसेल

### डिस्टिलरीचीं राहिलेलीं कामें चालू आहेत.

### ☆☆ ठेवींच्या मुदती वाढवून मिळत आहेत ☆☆

### नवीन ठेवी येत आहेत

### ठेवींच्या व्याजाचे दर

★ मुदत पांच वर्षें — व्याज ७॥ ( साडेसात ) टक्के.
★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ ( सात ) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ ( सहा ) टक्के.

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ पुणें २.
दि. १२-५-१९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंटस्.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.